.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 9 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ९ ॥

॥ दशक नववा : गुणरूप ॥ ९॥

समास पहिला : आशंकानाम

॥ श्रीराम ॥

निराकार म्हणिजे काये । निराधार म्हणिजे काये ।
निर्विकल्प म्हणिजे काये । निरोपावें ॥ १॥
निराकार म्हणिजे आकार नाहीं । निराधार म्हणिजे आधार नाहीं ।
निर्विकल्प म्हणिजे कल्पना नाहीं । परब्रह्मासी ॥ २॥
निरामय म्हणिजे काये । निराभास म्हणिजे काये ।
निरावेव म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ ३॥
निरामय म्हणिजे जळमये नाहीं । निराभास म्हणिजे भासचि नाहीं ।
निरावेव म्हणिजे अवेव नाहीं । परब्रह्मासी ॥ ४॥
निःप्रपंच म्हणिजे काये । निःकळंक म्हणिजे काये ।
निरोपाधी म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ ५॥
निःप्रपंच म्हणिजे प्रपंच नाहीं । निःकळंक म्हणिजे कळंक नाहीं ।
निरोपाधी म्हणिजे उपाधी नाहीं । परब्रह्मासी ॥ ६॥
निरोपम्य म्हणिजे काये । निरालंब म्हणिजे काये ।
निरापेक्षा म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ ७॥
निरोपम्य म्हणिजे उपमा नाहीं । निरालंब म्हणिजे अवलंबन नाहीं ।
निरापेक्षा म्हणिजे अपेक्षा नाहीं । परब्रह्मासी ॥ ८॥
निरंजन म्हणिजे काये । निरंतर म्हणिजे काये ।
निर्गुण म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ ९॥
निरंजन म्हणिजे जनचि नाहीं । निरंतर म्हणिजे अंतर नाहीं ।
निर्गुण म्हणिजे गुणचि नाहीं । परब्रह्मासी ॥ १०॥
निःसंग म्हणिजे काये । निर्मळ म्हणिजे काये ।
निश्चळ म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ ११॥
निःसंग म्हणिजे संगचि नाहीं । निर्मळ म्हणिजे मळचि नाहीं ।
निश्चळ म्हणिजे चळण नाहीं । परब्रह्मासी ॥ १२॥
निशब्द म्हणिजे काये । निर्दोष म्हणिजे काये ।
निवृत्ती म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ १३॥
निशब्द म्हणिजे शब्दचि नाही । निर्दोष म्हणिजे दोषचि नाही ।
निवृत्ति म्हणिजे वृत्तिच नाहीं । परब्रह्मासी ॥ १४॥
निःकाम म्हणिजे काये । निर्लेप म्हणिजे काये ।
निःकर्म म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ १५॥
निःकाम म्हणिजे कामचि नाहीं । निर्लेप म्हणिजे लेपचि नाहीं ।
निःकर्म म्हणिजे कर्मचि नाहीं । परब्रह्मासी ॥ १६॥
अनाम्य म्हणिजे काये । अजन्मा म्हणिजे काये ।
अप्रत्यक्ष म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ १७॥
अनाम्य म्हणिजे नामचि नाहीं । अजन्मा म्हणिजे जन्मचि नाहीं ।
अप्रत्यक्ष म्हणिजे प्रत्यक्ष नाहीं । परब्रह्म तें ॥ १८॥
अगणित म्हणिजे काये । अकर्तव्य म्हणिजे काये ।
अक्षै म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ १९॥
अगणित म्हणिजे गणित नाहीं । अकर्तव्य म्हणिजे कर्तव्यता नाहीं ।
अक्षै म्हणिजे क्षयचि नाहीं । परब्रह्मासी ॥ २०॥
अरूप म्हणिजे काये । अलक्ष म्हणिजे काये ।
अनंत म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २१॥
अरूप म्हणिजे रूपचि नाहीं । अलक्ष म्हणिजे लक्षत नाहीं ।
अनंत म्हणिजे अंतचि नाहीं । परब्रह्मासी ॥ २२॥
अपार म्हणिजे काये । अढळ म्हणिजे काये ।
अतर्क्य म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २३॥
अपार म्हणिजे पारचि नाहीं । अढळ म्हणिजे ढळचि नाहीं ।
अतर्क्य म्हणिजे तर्कत नाहीं । परब्रह्म तें ॥ २४॥
अद्वैत म्हणिजे काये । अदृश्य म्हणिजे काये ।
अच्युत म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २५॥
अद्वैत म्हणिजे द्वैतचि नाहीं । अदृश्य म्हणिजे दृश्यचि नाहीं ।
अच्युत म्हणिजे चेवत नाहीं । परब्रह्म तें ॥ २६॥
अच्छेद म्हणिजे काये । अदाह्य म्हणिजे काये ।
अक्लेद म्हणिजे काये । मज निरोपावें ॥ २७॥
अच्छेद म्हणिजे छेदेना । अदाह्य म्हणिजे जळेना ।
अक्लेद म्हणिजे कालवेना । परब्रह्म तें ॥ २८॥
परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहातां आपणचि तें ।
हें कळे अनुभवमतें । सद्गुरु केलियां ॥ २९॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आशंकानाम समास पहिला ॥ १॥ ९.१

समास दुसरा : ब्रह्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

जें जें कांहीं साकार दिसे । तें तें कल्पांतीं नासे ।
स्वरूप तें असतचि असे । सर्वकाळ ॥ १॥
जें सकळांमधें सार । मिथ्या नव्हे तें साचार ।
जें कां नित्य निरंतर । संचले असे ॥ २॥
तें भगवंताचें निजरूप । त्यासि बोलिजे स्वरूप ।
याहि वेगळे अमूप । नामें तयाचीं ॥ ३॥
त्यास नामाचा संकेत । कळावया हा दृष्टांत ।
परी तें स्वरूप नामातीत । असतचि असे ॥ ४॥
दृश्यसबाह्य संचलें । परी तें विश्वास चोरलें ।

जवळिच नाहीसें जालें । असतचि कैसें ॥ ५॥
ऐसा ऐकोनियां देव । उठे दृष्टीचा भाव ।
पाहों जातां दिसे सर्व । दृश्यचि आवघें ॥ ६॥
दृष्टीचा विषयो दृश्य । तोचि जालिया सादृश्य ।
तेणें दृष्टी पावे संतोष । परी तें देखणें नव्हे ॥ ७॥
दृष्टीस दिसे तें नासे । येतद्विषई श्रुति असे ।
म्हणौन जें दृष्टीस दिसे । तें स्वरूप नव्हे ॥ ८॥
स्वरूप तें निराभास । आणी दृश्य भासलें साभास ।
भासास बोलिलें नास । वेदांतशास्त्रीं ॥ ९॥
आणी पाहातां दृश्यचि भासे । वस्तु दृश्यावेगळी असे ।
स्वानुभवें पाहातां दिसे । तें दृश्यासबाह्य ॥ १०॥
जें निराभास निर्गुण । त्याची काये सांगावी खूण ।
परी तें स्वरूप जाण । सन्निधचि असें ॥ ११॥
जैसा आकाशीं भासला भास । आणी सकळांमध्यें आकाश ।
तैसा जाणिजे जगदीश । सबाह्य अभ्यांतरीं ॥ १२॥
उदकामधें परी भिजेना । पृथ्वीमधें परी झिजेना ।
वन्हीमधें परी सिजेना । स्वरूप देवाचें ॥ १३॥
तें रेंद्यामधें परी बुडेना । तें वायोमधें परी उडेना ।
सुवर्णी असे परी घडेना । सुवर्णासारिखें ॥ १४॥
ऐसें जें संचलें सर्वदा । परी ते आकळेना कदा ।
अभेदामाजीं वाढवी भेदा । ते हे अहंता ॥ १५॥
तिच्या स्वरूपाची खूण । सांगों कांहीं वोळखण ।
अहंतेचें निरूपण । सावध ऐका ॥ १६॥
जे स्वरूपाकडे पावे । अनुभवासवें झेंपावे ।
अनुभवाचे शब्द आघवे । बोलोन दावी ॥ १७॥
म्हणे आतां मीच स्वरूप । तेंचि अहंतेचें रूप ।
निराकारीं आपें आप । वेगळी पडे ॥ १८॥
स्वयें मीच आहे ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम ।
ऐसियें सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहातां दिसे ॥ १९॥
कल्पना आकळी हेत । वस्तु कल्पनातीत ।
म्हणौन नाकळे अंत । अनंताचा ॥ २०॥
अन्वये आणि वीतरेक । हा शब्द कोणीयेक ।
निशब्दाच अंतरविवेक । शोधिला पाहिजे ॥ २१॥
आधीं घेईजे वाच्यांश । मग वोळखिजे लक्ष्यांश ।
लक्ष्यांशीं पाहातां वाच्यांश । असेल कैंचा ॥ २२॥
सर्वब्रह्म आणी विमळब्रह्म । हा वाच्यांशाचा अनुक्रम ।
शोधितां लक्ष्यांशाचें वर्म । वाच्यांश नसे ॥ २३॥
सर्व विमळ दोनी पक्ष । वाच्यांशीं आटती प्रत्यक्ष ।
लक्ष्यांशी लावीता लक्ष । पक्षपात घडे ॥ २४॥
हें लक्ष्यांशें अनुभवणें । येथें नाहीं वाच्यांश बोलणे ।
मुख्य अनुभवाचे खुणे । वाचारंभ कैंचा ॥ २५॥
परा पश्यंती मधेमां वैखरी । जेथें वोसरती च्यारी ।
तेथें शब्द कळाकुंसरी । कोण काज ॥ २६॥
शब्द बोलतां सवेंच नासे । तेथें शाश्वतता कोठें असे ।
प्रत्यक्षास प्रमाण नसे । बरें पाहा ॥ २७॥
शब्द प्रत्यक्ष नासिवंत । म्हणोन घडे पक्षपात ।
सर्व विमळ ऐसा हेत । अनुभवीं नाहीं ॥ २८॥
ऐक अनुभवाचें लक्षण । अनुभव म्हणिजे अनन्य जाण ।
ऐक अनन्याचें लक्षण । ऐसें असे ॥ २९॥
अनन्य म्हणिजे अन्य नसे । आत्मनिवेदन जैसें ।
संगभंगें असतचि असे । आत्मा आत्मपणें ॥ ३०॥
आत्म्यास नाहीं आत्मपण । हेंचि निःसंगाचें लक्षण ।
हें वाच्यांशें बोलिले जाण । कळावया कारणें ॥ ३१॥
येरवीं लक्ष्यांश तो वाच्यांशें । सांगिजेल हें घडे कैसें ।
वाक्य विवरणें अपैसें । कळों लागे ॥ ३२॥
करावें तत्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण ।
पाहावें आपणास आपण । म्हणिजे कळे ॥ ३३॥
हें न बोलतांच विवरिजे । विवरोन विरोन राहिजे ।
मग अबोलणेंचि साजे । माहापुरुषीं ॥ ३४॥
शब्दचि निशब्द होती । श्रुति नेति नेति नेति म्हणती ।
हें तों आलें आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आतां ॥ ३५॥
प्रचित आलियां अनुमान । हा तों प्रत्यक्ष दुराभिमान ।
तरी आतां मी अज्ञान । मज कांहींच न कळे ॥ ३६॥
मी लटिका माझें बोलणें लटिकें । मी लटिका माझें चालणें लटिकें ।
मी माझें अवघेंचि लटिकें । काल्पनिक ॥ ३७॥
मज मुळींच नाहीं ठाव । माझे बोलणें अवघेंचि वाव ।
हा प्रकृतीचा स्वभाव । प्रकृती लटिकी ॥ ३८॥
प्रकृती आणी पुरुष । यां दोहींस जेथें निरास ।
तें मीपण विशेष । हें केवि घडे ॥ ३९॥
जेथें सर्व हि अशेष जालें । तेथें विशेष कैंचे आलें ।
मी मौनी म्हणतां भंगलें । मौन्य जैसें ॥ ४०॥
आतां मौन्य न भंगावें । करून कांहींच न करावें ।
असोन निशेष नसावें । विवेकबळें ॥ ४१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
ब्रह्मनिरूपणनाम समास दुसरा ॥ २॥ ९.२

समास तिसरा : निःसंदेह निरूपण

॥ श्रीराम ॥

श्रोतीं केला अनुमान । ऐसें कैसें ब्रह्मज्ञान ।
कांहींच नाहीं असोन । हें केवि घडे ॥ १॥
सकळ करून अकर्ता । सकळ भोगून अभोक्ता ।
सकळांमधें अलिप्तता । येईल कैसी ॥ २॥
तथापि तुम्ही म्हणतां । योगी भोगून अभोक्ता ।
स्वर्गनरकहि आतां । येणेंचि न्यायें ॥ ३॥
जन्म मृत्यु भोगिलेच भोगी । परी तो भोगून अभोक्ता योगी ।
यातना हि तयालागीं । येणेंचि पाडें ॥ ४॥
कुटून नाहीं कुटिला । रडोन नाहीं रडला ।

कुंथोन नाहीं कुंथिला । योगेश्वर ॥ ५ ॥
जन्म नसोन घातला । पतित नसोन जाला ।
यातना नसोन पावला । नानापरी ॥ ६ ॥
ऐसा श्रोतयांचा अनुमान । श्रोतीं घेतलें आडरान ।
आतां याचें समाधान । केलें पाहिजे ॥ ७ ॥
वक्ता म्हणे सावध व्हावें । तुम्ही बोलतां बरवें ।
परी हें तुमच्याच अनुभवें । तुम्हास घडे ॥ ८ ॥
ज्याचा अनुभव जैसा । तो तो बोलतो तैसा ।
संपदेविण हो धिवसा । तो निरार्थक ॥ ९ ॥
नाहीं ज्ञानाची संपदा । अज्ञानदारिद्रें आपदा ।
भोगिल्याच भोगी सदा । शब्दज्ञानें ॥ १० ॥
योगी वोळखावा योगेश्वरें । ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें ।
माहाचतुर तो चतुरें । वोळखावा ॥ ११ ॥
अनुभवी अनुभवियास कळे । अलिप्त अलिप्तपणें निवळें ।
विदेहाचा देहभाव गळे । विदेही देखतां ॥ १२ ॥
बद्धासारिखा सिद्ध । आणी सिद्धासारिखा बद्ध ।
येक भावील तो अबद्ध । म्हणावाच नलगे ॥ १३ ॥
झडपला तो देहधारी । आणी देहधारक पंचाक्षरी ।
परंतु दोघां येकसरी । कैसी द्यावी ॥ १४ ॥
तैसा अज्ञान पतित । आणी ज्ञानी जीवन्मुक्त ।
दोघे समान मानील तो युक्त । कैसा म्हणावा ॥ १५ ॥
आतां असो हे दृष्टांत । प्रचित बोलों कांहीं हेत ।
येथें श्रोतीं सावचित्त । क्षणयेक व्हावें ॥ १६ ॥
जो जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला ।
जो अनन्यपणें उरला । नाहींच कांहीं ॥ १७ ॥
तयास कैसें गवसावें । शोधूं जातां तोचि व्हावें ।
तोचि होतां म्हणावें । नलगे कांहीं ॥ १८ ॥
देहीं पाहातां दिसेना । तत्वें शोधितां भासेना ।
ब्रह्म आहे निवडेना । कांहीं केल्यां ॥ १९ ॥
दिसतो तरी देहधारी । परी कांहींच नाहीं अंतरीं ।
तयास पाहातां वरिवरी । कळेल कैसा ॥ २० ॥
कळाया शोधावें अंतर । तंव तो नित्य निरंतर ।
जयास धुंडितां विकार । निर्विकार होती ॥ २१ ॥
तो परमात्मा केवळ । तयास नाहीं मायामळ ।
अखंड हेतूचा विटाळ । जालाच नाहीं ॥ २२ ॥
ऐसा जो योगीराज । तो आत्मा सहजीं सहज ।
पूर्णब्रह्म वेदबीज । देहाकारें कळेना ॥ २३ ॥
देह भावितां देहचि दिसे । परी अंतर अनारिसें असे ।
तयास शोधितां नसे । जन्म मरण ॥ २४ ॥
जयास जन्ममरण व्हावें । तें तो नव्हेचि स्वभावें ।
नाहींच तें आणावें । कोठून कैंचें ॥ २५ ॥
निर्गुणास जन्म कल्पिला । अथवा निर्गुण उडविला ।
तरी उडाला आणी जन्मला । आपला आपण ॥ २६ ॥
माध्यांनीं थुंकितां सूर्यावरी । तो थुंका पडेल आपणांच वरी ।
दुसऱ्यास चिंतितां अंतरीं । आपणास घडे ॥ २७ ॥
समर्थ रायाचे महिमान । जाणतां होते समाधान ।
परंतु भुंकों लागलें स्वान । तरी तें स्वानचि आहे ॥ २८ ॥
ज्ञानी तो सत्यस्वरूप । अज्ञान देखे मनुष्यरूप ।
भावासारिखा फळद्रूप । देव तैसा ॥ २९ ॥
देव निराकार निर्गुण । लोक भाविती पाषाण ।
पाषाण फुटतो निर्गुण । फुटेल कैसा ॥ ३० ॥
देव सदोदित संचला । लोकीं बहुविध केला ।
परंतु बहुविध जाला । हें तों घडेना ॥ ३१ ॥
तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी ।
विवेकें आत्मनिवेदनी । आत्मरूपी ॥ ३२ ॥
जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार ।
परी काष्ठ होईल हा विचार । बोलोंच नये ॥ ३३ ॥
कर्पूर असे तों जळतां दिसे । तैसा ज्ञानीदेह भासे ।
तयास जन्मवितां कैसें । कर्दळीउदरीं ॥ ३४ ॥
बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उकलेना ।
वोघ निवडितां निवडेना । गंगेमधें ॥ ३५ ॥
वोघ गंगेमागें दिसे । गंगा येकदेसी असे ।
साधु कांहींच न भासे । आणी आत्मा सर्वगत ॥ ३६ ॥
सुवर्ण नव्हे लोखंड । साधूस जन्म थोतांड ।
अज्ञान प्राणी जडमूढ । तयास हें उमजेचिना ॥ ३७ ॥
अंधास कांहींच न दिसे । तरी ते लोक आंधळे कैसे ।
सन्नपातें बरळतसे । सन्नपाती ॥ ३८ ॥
जो स्वप्नामधें भ्याला । तो स्वप्नभयें वोसणाला ।
तें भये जागत्याला । केवि लागे ॥ ३९ ॥
मुळी सर्पाकार देखिली । येक भ्याला येकें वोळखिली ।
दोघांची अवस्था लेखिली । सारिखीच कैसी ॥ ४० ॥
हातीं धरितां हि डसेना । हें येकास भासेना ।
तरी ते त्याची कल्पना । तयासीच बाधी ॥ ४१ ॥
विंचु सर्प डसला । तेणें तोचि जाकळला ।
तयाचेनि लोक जाला । कासावीस कैसा ॥ ४२ ॥
आतां तुटला अनुमान । ज्ञानियास कळे ज्ञान ।
अज्ञानास जन्ममरण । चुकेचिना ॥ ४३ ॥
येका जाणण्यासाठीं । लोक पडिले अटाटीं ।
नेणपणें हिंपुटी होती । जन्ममृत्यें ॥ ४४ ॥
तेंचि कथानुसंधान । पुढें केलें परिच्छिन्न ।
सावधान सावधान । म्हणे वक्ता ॥ ४५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
निःसंदेहनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ ९.३

समास चवथा : जाणपणनिरूपण

॥ श्रीराम ॥

पृथ्वीमधें लोक सकळ । येक संपन्न येक दुर्बळ ।

येक निर्मळ येक वोंगळ । काय निमित्य ॥ १ ॥
कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगिती ।
कितीयेकांची उत्तम स्थिती । कित्येक अधमोद्धम ॥ २ ॥
ऐसें काय निमित्य जालें । हें मज पाहिजे निरोपिलें ।
याचे उत्तर ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ ३ ॥
हे सकळ गुणापासीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।
अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ॥ ४ ॥
जो जो जेथें उपजला । तो ते वेवसाई उमजला ।
तयास लोक म्हणती भला । कार्यकर्ता ॥ ५ ॥
जाणता तो कार्य करी । नेणतां कांहींच न करी ।
जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ॥ ६ ॥
हें तों प्रकटचि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे ।
विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ॥ ७ ॥
आपुली विद्या न सिकसी । तरी काये भीक मागसी ।
जेथें तेथें बुद्धी ऐसी । वडिलें सांगती ॥ ८ ॥
वडिल आहे करंटा । आणी समर्थ होये धाकुटा ।
कां जे विद्येनें मोटा । म्हणोनिया ॥ ९ ॥
विद्या नाही बुद्धी नाही । विवेक नाहीं साक्षेप नाहीं ।
कुशळता नाहीं व्याप नाहीं । म्हणौन प्राणी करंटा ॥ १० ॥
इतुकें हि जेथें वसे । तेथें वैभवास उणें नसे ।
वैभव सांडितां अपैसें । पाठीं लागे ॥ ११ ॥
वडिल समर्थ धाकुटा भिकारी । ऐका याची कैसी परी ।
वडिला ऐसा व्याप न करी । म्हणोनियां ॥ १२ ॥
जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव ।
तोलासारिखा हावभाव । लोक करिती ॥ १३ ॥
विद्या नसे वैभव नसे । तेथें निर्मळ कैंचा असे ।
करंटेपणें वोखटा दिसे । वोंगळ आणी विकारी ॥ १४ ॥
पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ ।
गुण नस्तां जिणें वेर्थ । प्राणीमात्राचें ॥ १५ ॥
गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं महत्व नाहीं ।
कुशळता नाहीं तर्क नाहीं । प्राणीमात्रासी ॥ १६ ॥
याकारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचें लक्षण ।
लक्षणेवीण अवलक्षण । सहजचि जालें ॥ १७ ॥
जनामधें तो जाणता । त्यास आहे मान्यता ।
कोणी येक विद्या असतां । महत्व पावे ॥ १८ ॥
प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ ।
नेणता जाणिजे वेर्थ । निःकारण ॥ १९ ॥
नेणतां विंचु सर्प डसे । नेणतां जीवघात असे ।
नेणतां कार्य नासे । कोणी येक ॥ २० ॥
नेणतां प्राणी सिंतरे । नेणपणें तऱ्हे भरे ।
नेणपणे ठके विसरे । पदार्थ कांहीं ॥ २१ ॥
नेणतां वैरी जिंकिती । नेणतां अपाई पडती ।
नेणतां संव्हारती घडती । जीवनास ॥ २२ ॥
आपुले स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना ।
ज्ञान नेणतां अज्ञाना । अधोगती ॥ २३ ॥
मायाब्रह्म जीवशिव । सारासार भावाभाव ।
जाटिल्यासाठीं होतें वाव । जन्ममरण ॥ २४ ॥
कोण कर्ता निश्चयेंसीं । बद्ध मोक्ष तो कोणासी ।
ऐसें जाणतां प्राणीयासी । सुटिकां घडे ॥ २५ ॥
जाणिजे देव निर्गुण । जाणिजे मी तो कोण ।
जाणिजे अनन्यलक्षण । म्हणिजे मुक्त ॥ २६ ॥
जितुकें जाणोन सांडिलें । तितुकें दृश्य वोलांडिलें ।
जाणत्यास जाणतां तुटलें । मूळ मीपणाचें ॥ २७ ॥
न जाणतां कोटीवरी । साधनें केलीं परोपरीं ।
तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं ॥ २८ ॥
मायाब्रह्म वोळखावें । आपणास आपण जाणावें ।
इतुक्यासाठीं स्वभावें । चुके जन्म ॥ २९ ॥
जाणतां समर्थाचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनंतर ।
भाग्य वैभव अपार । तेणेचि पावे ॥ ३० ॥
म्हणौन जाणणें नव्हे सामान्य । जाणतां होईजे सर्वमान्य ।
कांहींच नेणतां अमान्य । सर्वत्र करिती ॥ ३१ ॥
पदार्थ देखोन भूत भावी । नेणतें झडपोन प्राण ठेवी ।
मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ॥ ३२ ॥
जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म ।
सकळ कांहीं धर्माधर्म । जाणतां कळे ॥ ३३ ॥
नेणत्यास येमयातना । जाणत्यास कांहींच लागेना ।
सकळ जाणोन विवंचना । करी तो मुक्त ॥ ३४ ॥
नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण ।
नेणतां कठीण वर्तमान । समस्तांस होये ॥ ३५ ॥
म्हणोनियां नेणणें खोटें । नेणते प्राणी करंटे ।
जाणतां विवरतां तुटे । जन्ममरण ॥ ३६ ॥
म्हणोन अलक्ष करूं नये । जाणणें हाचि उपाये ।
जाणतां सापडें सोये । परलोकाची ॥ ३७ ॥
जाणणें सकळांस प्रमाण । मूर्खास वाटे अप्रमाण ।
परंतु अलिप्तपणाची खूण । जाणतां कळे ॥ ३८ ॥
येक जाणणें करून परतें । कोण सोडी प्राणीयातें ।
कोणी येक कार्य जें तें । जाटिल्याविण न कळे ॥ ३९ ॥
जाणणें म्हणिजे स्मरण । नेणणें म्हणिजे विस्मरण ।
दोहींमधें कोण प्रमाण । शाहाणे जाणती ॥ ४० ॥
जाणते लोक ते शाहाणे । नेणते वेडे दैन्यवाणे ।
विज्ञान तेहि जाणपणें । कळो आलें ॥ ४१ ॥
जेथें जाणपण खुंटलें । तेथें बोलणें हि तुटलें ।
हेतुरहित जालें । समाधान ॥ ४२ ॥
श्रोतें म्हणती हें प्रमाण । जालें परम समाधान ।
परी पिंडब्रह्मांड ऐक्यलक्षण । मज निरोपावें ॥ ४३ ॥
ब्रह्मांडीं तेंचि पिंडीं असे । बहुत बोलती ऐसें ।

परंतु याचा प्रत्यय विलसे । ऐसें केलें पाहिजे ॥ ४४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
जाणपणनिरूपणनाम समास चौथा ॥ ४ ॥ ९.४

समास पांचवा : अनुमाननिर्शन
॥ श्रीराम ॥
पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । नये आमुच्या अनुमाना ।
प्रचित पाहातां नाना । मतें भांबावती ॥ १॥
जें पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । ऐसी बोलावयाचि प्रौढी ।
हें वचन घडिनें घडी । तत्वज्ञ बोलती ॥ २॥
पिंड ब्रह्मांड येक राहाटी । ऐसी लोकांची लोकधाटी ।
परी प्रत्ययाचे परीपाटीं । तगों न सके ॥ ३॥
स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । हे च्यारी पिंडींचे देह जाण ।
विराट हिरण्य अव्याकृत मूळप्रकृती हे खूण । ब्रह्मांडींची ॥ ४॥
हे शास्त्राधाटी जाणावी । परी प्रचित कैसी आणावी ।
प्रचित पाहातां गथागोवी । होत आहे ॥ ५॥
पिंडीं आहे अंतःकरण । तरी ब्रह्मांडीं विष्णु जाण ।
पिंडीं बोलिजेतें मन । तरी ब्रह्मांडीं चंद्रमा ॥ ६॥
पिंडीं बुद्धी ऐसें बोलिजे । तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे ।
पिंडीं चित्त ब्रह्मांडीं वोळखिजे । नारायेणु ॥ ७॥
पिंडीं बोलिजे अहंकार । ब्रह्मांडीं रुद्र हा निर्धार ।
ऐसा बोलिला विचार । शास्त्रांतरीं ॥ ८॥
तरी कोण विष्णूचें अंतःकर्ण । चंद्राचें कैसें मन ।
ब्रह्मयाचे बुद्धीलक्षण । मज निरोपावें ॥ ९॥
नारायणाचें कैसें चित्त । रुद्रअहंकाराचा हेत ।
हा विचार पाहोन नेमस्त । मज निरोपावा ॥ १०॥
प्रचितनिश्चयापुढें अनुमान । जैसें सिंहापुढें आलें स्वान ।
खऱ्यापुढें खोटें प्रमाण । होईल कैसें ॥ ११॥
परी यास पारखी पाहिजे । पारखीनें निश्चय लाहिजे ।
परिक्षा नस्तां राहिजे । अनुमानसंशईं ॥ १२॥
विष्णु चंद्र आणी ब्रह्मा । नारायेण आणी रुद्रनामा ।
यां पाचांची अंतःकर्णपंचकें आम्हा । स्वामी निरोपावीं ॥ १३॥
येथें प्रचित हें प्रमाण । नलगे शास्त्राचा अनुमान ।
अथवा शास्त्रीं तरी पाहोन । प्रत्ययो आणावा ॥ १४॥
प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें ।
तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें ॥ १५॥
तेथें काये हो ऐकावें । आणी काये शोधून पाहावें ।
जेथें प्रत्यायाच्या नावें । सुन्याकार ॥ १६॥
आवघें आंधळेचि मिळाले । तेथें डोळसाचें काय चाले ।
अनुभवाचे नेत्र गेले । तेथें अंधकार ॥ १७॥
नाही दुग्ध नाही पाणी । केली विष्ठेची सारणी ।
तेथें निवडावयाचे धनी । ते येक डोंबकावळे ॥ १८॥
आपुले इछेनें बोलिलें । पिंडाऐसे ब्रह्मांड कल्पिले ।
परी तें प्रचितीस आलें । कोण्या प्रकारें ॥ १९॥
म्हणोन हा अवघाच अनुमान । अवघें कल्पनेचें रान ।
भलीं न घ्यावें आडरान । तश्करीं घ्यावें ॥ २०॥
कल्पून निर्मिले मंत्र । देव ते कल्पनामात्र ।
देव नाहीं स्वतंत्र । मंत्राधेन ॥ २१॥
येथें न बोलतां जाणावें । बोलणें विवेका आणावें ।
आंधळें पाउलीं वोळखावें । विचक्षणें ॥ २२॥
जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें ।
परी हें पाहिजे निवडिलें । प्रचितीनें ॥ २३॥
ब्रह्मयानें सकळ निर्मिलें । ब्रह्मयास कोणें निर्माण केलें ।
विष्णूनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ॥ २४॥
रुद्र विश्वसंव्हारकर्ता । परी कोण रुद्रास संव्हारिता ।
कोण काळाचा नियंता । कळला पाहिजे ॥ २५॥
याचा कळेना विचार । तों अवघा अंधकार ।
म्हणोनियां सारासार । विचार करणें ॥ २६॥
ब्रह्मांड स्वभावेंचि जालें । परंतु हें पिंडाकार कल्पिलें ।
कल्पिलें परी प्रत्यया आलें । नाहीं कदा ॥ २७॥
पाहातां ब्रह्मांडाची प्रचिती । कित्येक संशय उठती ।
हें कल्पनिक श्रोतीं । नेमस्त जाणावें ॥ २८॥
पिंडासारिखी ब्रह्मांडरचना । कोण आणितो अनुमाना ।
ब्रह्मांडीं पदार्थ नाना । ते पिंडीं कैंचे ॥ २९॥
औटकोटी भुतावळी । औटकोटी तीर्थावळी ।
औटकोटी मंत्रावळी । पिंडीं कोठें ॥ ३०॥
तेतीस कोटी सुरवर । अठ्यांसि सहस्र ऋषेश्वर ।
नवकोटी कात्यायेणीचा विचार । पिंडीं कोठें ॥ ३१॥
च्यामुंडा छप्पन्न कोटी । कित्येक जीव कोट्यानुकोटी ।
चौऱ्यासी लक्ष योनींची दाटी । पिंडीं कोठें ॥ ३२॥
ब्रह्मांडीं पदार्थ निर्माण जाले । पृथकाकारें वेगळाले ।
तेहि तितुके निरोपिले । पाहिजेत पिंडीं ॥ ३३॥
जितुक्या औषधी तितुकीं फळे । नाना प्रकारीं रसाळें ।
नाना बीजें धान्यें सकळें । पिंडीं निरोपावीं ॥ ३४॥
हें सांगतां पुरवेना । तरी उगेंचि बोलावेना ।
बोलिलें न येतां अनुमाना । लाजिरवाणें ॥ ३५॥
तरी हें निरोपिलें नवचे । फुकट बोलतां काय वेचे ।
याकारणें अनुमानाचें । कार्य नाहीं ॥ ३६॥
पांच भूतें ते ब्रह्मांडीं । आणि पांचचि वर्तती पिंडीं ।
याची पाहावी रोकडी । प्रचीत आतां ॥ ३७॥
पांचा भूतांचे ब्रह्मांड । आणी पंचभूतिक हें पिंड ।
यावेगळें तें उदंड । अनुमानज्ञान ॥ ३८॥
जितुकें अनुमानाचें बोलणें । तितुकें वमनप्राये त्यागणें ।
निश्चयात्मक तेंचि बोलणें । प्रत्ययाचें ॥ ३९॥
जेंचि पिंडीं तेंचि ब्रह्मांडीं । प्रचित नाहीं कीं रोकडी ।
पंचभूतांची तांतडी । दोहीकडे ॥ ४०॥
म्हणोनि देहींचें थानमान । हा तों अवघाचि अनुमान ।

आतां येक समाधान । मुख्य तें कैसें ॥ ४१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अनुमाननिर्शननाम समास पांचवा ॥ ५॥ ९.५

समास सहावा : गुणरूपनिरूपण
॥ श्रीराम ॥
आकाश जैसें निराकार । तैसा ब्रह्माचा विचार ।
तेथें वायोचा विकार । तैसी मूळमाया ॥ १॥
हें दासबोधीं असे बोलिलें । ज्ञानदशकीं प्रांजळ केलें ।
मूळमायेंत दाखविलें । पंचभूतिक ॥ २॥
तेथें जाणीव तो सत्त्वगुण । मध्य तो रजोगुण ।
नेणीव तमोगुण । जाणिजे श्रोतीं ॥ ३॥
म्हणाल तेथें कैंची जाणीव । तरी ऐका याचा अभिप्राव ।
पिंडीं माहाकारण देहीं सर्व । साक्षिणी अवस्था ॥ ४॥
तैसी मूळप्रकृती ब्रह्मांडींचें । देह माहाकारण साचें ।
म्हणोन तेथेंजाणीवेचें । अधिष्ठान आलें ॥ ५॥
असो मूळमायेभीतरीं । गुप्त त्रिगुण वास करी ।
पष्ट होती संधी चतुरीं । जाणावी गुणक्षोभिणी ॥ ६॥
जैस तृणाचा पोटराकळा । पुढें उकलोन होये मोकळा ।
तैसी मूळमाया अवलीळा । गुण प्रसवली ॥ ७॥
मूळमाया वायोस्वरूप । ऐक गुणक्षोभिणीचें रूप ।
गुणविकार होतांचि अल्प । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८॥
पुढें जाणीव मध्यस्त नेणीव । मिश्रित चालिला स्वभाव ।
तेथें मातृकास ठाव । शब्द जाला ॥ ९॥
तो शब्दगुण आकाशींचा । ऐसा अभिप्राव येथीचा ।
शब्देंचि वेदशास्त्रांचा । आकार जाला ॥ १०॥
पंचभूतें त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार ।
जाणीवनेणीवेचा विचार । वायोचि करितां ॥ ११॥
वायो नस्तां कैंची जाणीव । जाणीव नस्तां कैंची नेणीव ।
जाणीवनेणीवेस ठाव । वायोगुणें ॥ १२॥
जेथें मुळीच नाही चळण । तेथें कैंचें जाणीवलक्षण ।
म्हणोनि वायोचा गुण । नेमस्त जाणावा ॥ १३॥
येकापासून येक जालें । हें येक उगेंचि दिसोन आलें ।
स्वरूप मुळीच भासलें । त्रिगुणभूतांचें ॥ १४॥
ऐसा हा मुळींचा कर्दमु । पुढें पष्टतेचा अनुक्रमु ।
सांगतां येकापासून येक उगमु । हें हि खरें ॥ १५॥
वायोच कर्दम बोलिला । तयापासून अग्नि जाला ।
तोहि पाहातां देखिला । कर्दमुचि ॥ १६॥
अग्निपासून जालें आप । तेंहि कर्दमस्वरूप ।
आपापासून पृथ्वीचें रूप । तेंहि कर्दमरूपी ॥ १७॥
येथें आशंका उठिली । भूतांस जाणीव कोठें देखिली ।
तरी भूतांत जाणीव हे ऐकिली । नाहीं वार्ता ॥ १८॥
जाणीव म्हणिजे जाणतें चळण । तेंचि वायोचें लक्षण ।
वायोआंगीं सकळ गुण । मागां निरोपिलें ॥ १९॥
म्हणोन जाणीवनेणीवमिश्रीत । अवघें चालिलें पंचभूत ।
म्हणोनियां भूतांत । जाणीव असे ॥ २०॥
कोठें दिसे कोठें न दिसे । परी तें भूतीं व्यापून असे ।
तिक्षण बुद्धी करितां भासे । स्थूळ सुक्ष्म ॥ २१॥
पंचभूतें आकारली । भूतीं भूतें कालवलीं ।
तरी पाहातां भासलीं । येक स्थूळ येक सूक्ष्म ॥ २२॥
निरोधवायो न भासे । तैसी जणीव न दिसे ।
न दिसे परी ते असे । भूतरूपें ॥ २३॥
काष्टीं अग्नी दिसेना । निरोधवायो भासेना ।
जणीव तैसी लक्षेना । येकायेकीं ॥ २४॥
भूतें वेगळालीं दिसती । पाहातां येकचि भासती ।
बहुत धूर्तपणें प्रचिती । वोळखावी ॥ २५॥
ब्रह्मापासुन मूळमाया । मूळमायेपासून गुणमाया ।
गुणमायेपासून तया । गुणास जन्म ॥ २६॥
गुणापासूनियां भूतें पावली । पष्ट दशेतें ।
ऐसीयांचीं रूपें समस्तें । निरोपिलीं ॥ २७॥
आकाश गुणापासून जालें । हें कदापी नाही घडलें ।
शब्दगुणास कल्पिलें । आकाश वायां ॥ २८॥
येक सांगतां येकचि भावी । उगीच करी गथागोवी ।
तया वेड्याची उगवी । कोणें करावी ॥ २९॥
सिकविल्यां हि कळेना । उमजविल्यां हि उमजेना ।
दृष्टांतेंहि तर्केना । मंदरूप ॥ ३०॥
भूतांहून भूत थोर । हा हि दाविला विचार ।
परी भूतांवडिल स्वतंत्र । कोण आहे ॥ ३१॥
जेथें मूळमाया पंचभूतिक । तेथें काये राहिला विवेक ।
मूळमायेपरतें येक । निर्गुणब्रह्म ॥ ३२॥
ब्रह्मीं मूळमाया जाली । तिची लीळा परीक्षिली ।
तंव ते निखळ वोतली । भूतेंत्रिगुणांची ॥ ३३॥
भूतें विकारवंत चत्वार । आकाश पाहातां निर्विकार ।
आकाश भूत हा विचार । उपाधीकरितां ॥ ३४॥
पिंडीं व्यापक म्हणोन जीव । ब्रह्मांडीं व्यापक म्हणोन शिव ।
तैसाच हाहि अभिप्राव । आकाशाचा ॥ ३५॥
उपाधीमधें सापडलें । सूक्ष्म पाहातां भासलें ।
इतुक्यासाठीं आकाश जालें । भूतरूप ॥ ३६॥
आकाश अवकाश तो भकास । परब्रह्म तें निराभास ।
उपाधीं नस्ता जें आकाश । तेंचि ब्रह्म ॥ ३७॥
जाणीव नेणीव मध्यमान । हेंचि गुणाचें प्रमाण ।
येथें निरोपिलें त्रिगुण । रूपेंसहित ॥ ३८॥
प्रकृती पावली विस्तारातें । पुढे येकाचें येकचि होतें ।
विकारवंतचि तयातें । नेम कैंचा ॥ ३९॥
काळें पांढरें मेळवितां । पारवें होतें तत्वता ।
काळें पिवळें मेळवितां । हिरवें होये ॥ ४०॥
ऐसें रंग नानापरी । मेळवितां पालट धरी ।

तैसें दृश्य हें विकारी । विकारवंत ॥ ४१॥
येका जीवनें नाना रंग । उमटों लागती तरंग ।
पालटाचा लागवेग । किती म्हणोन पाहावा ॥ ४२॥
येका उदकाचे विकार । पाहातां दिसती अपार ।
पांचा भूतांचे विस्तार । चौर्‍यासी लक्ष योनी ॥ ४३॥
नाना देहाचें बीज उदक । उदकापसून सकळ लोक ।
किडा मुंगी स्वापदादिक । उदकेंचि होयें ॥ ४४॥
शुक्लीत शोणीत म्हणिजे नीर । त्या नीराचें हें शरीर ।
नखें दंत अस्तिमात्र । उदकाच्या होती ॥ ४५॥
मुळ्यांचे बारीक पागोरे । तेणें पंथें उदक भरे ।
त्या उदकेंचि विस्तारे । वृक्षमात्र ॥ ४६॥
अंबवृक्ष मोहरा आले । अवघे उदकाकरितां जाले ।
फळीं फुलीं लगडले । सावकास ॥ ४७॥
खोड फोडुन अंबे पाहातां । तेथें दिसेना सर्वथा ।
खांद्या फोडुन फळें पाहातां । वोलीं सालें ॥ ४८॥
मुळापासून सेवटवरी । फळ नाहीं तदनंतरीं ।
जळरूप फळ चतुरीं । विवेकें जाणावें ॥ ४९॥
तेंचि जळ सेंड्या चढे । तेव्हां वृक्षमात्र लगडे ।
येकाचें येकचि घडे । येणें प्रकारें ॥ ५०॥
पत्रें पुष्पें फळें भेद । किती करावा अनुवाद ।
सूक्ष्म दृष्टीनें विशद । होत आहे ॥ ५१॥
भूतांचे विकार सांगों किती । क्षणक्षणा पालटती ।
येकाचे येकचि होती । नाना वर्ण ॥ ५२॥
त्रिगुणभूतांची लटपट । पाहों जातां हे खटपट ।
बहुरूप बहु पालट । किती म्हणोन सांगावा ॥ ५३॥
ये प्रकृतीचा निरास । विवेकें वारावा सावकास ।
मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा ॥ ५४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुणरूपनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥ ६.६

समास सातवा : विकल्पनिरूपण

॥ श्रीराम ॥

आधी स्थूळ आहे येक । तरी मग अंतःकरण पंचक ।
जाणतेपणाचा विवेक । स्थूळाकरितां ॥ १॥
तैसेंचि ब्रह्मांडेंवीण कांहीं । मूळमायेसि जाणीव नाहीं ।
स्थूळाच्या आधारें सर्व हि । कार्य चाले ॥ २॥
तें स्थूळचि नस्तां निर्माण । कोठें राहेल अंतःकर्ण ।
ऐसा श्रोतीं केला प्रश्न । याचें उत्तर ऐका ॥ ३॥
कोसले अथवा कांटेघरें । नाना पृष्ठिभागीं चालती घरें ।
जीव करिती लहानथोरें । शक्तीनुसार ॥ ४॥
शंख सिंपी घुला कवडें । आधीं त्यांचें घर घडे ।
किंवा आधीं निर्माण किडे । हें विचारावें ॥ ५॥
आधी प्राणी ते होती । मग घरें निर्माण करिती ।
हे तों प्रत्यक्ष प्रचिती । सांगणें नलगे ॥ ६॥
तैसें आधी सूक्ष्म जाण । मग स्थूळ होतें निर्माण ।
येणें दृष्टांतें प्रश्न । फिटला श्रोतयांचा ॥ ७॥
तव श्रोता पुसे आणीक । जी आठवलें कांहीं येक ।
जन्ममृत्युचा विवेक । मज निरोपावा ॥ ८॥
कोण जन्मास घालितें । आणी मागुता कोण जन्म घेतें ।
हें प्रत्यया कैसें येतें । कोण्या प्रकारें ॥ ९॥
ब्रह्मा जन्मास घालितो । विष्णु प्रतिपाळ करितो ।
रुद्र अवघें संव्हारितो । ऐसें बोलती ॥ १०॥
तरीं हें प्रवृतीचें बोलणें । प्रत्ययास आणी उणें ।
प्रत्यय पाहातां श्लाघ्यवाणें । होणार नाहीं ॥ ११॥
ब्रह्मयास कोणें जन्मास घातलें । विष्णूस कोणें प्रतिपाळिलें ।
रुद्रास कोणें संव्हारिलें । माहाप्रळई ॥ १२॥
म्हणौनि हा सृष्टीभाव । अवघा मायेचा स्वभाव ।
कर्ता म्हणों निर्गुण देव । तरी तो निर्विकारी ॥ १३॥
म्हणावें माया जन्मास घाली । तरी हे आपणचि विस्तारली ।
आणी विचारितां थारली । हें हि घडेना ॥ १४॥
आतां जन्मतो तो कोण । कैसी त्याची वोळखण ।
आणी संचिताचें लक्षण । तेंहि निरोपावें ॥ १५॥
पुण्याचें कैसें रूप । आणी पापाचें कैसें स्वरूप ।
याहि शब्दाचा आक्षेप । कोण कर्ता ॥ १६॥
हें कांहींच न ये अनुमाना । म्हणती जन्म घेते वासना ।
परी ते पाहातां दिसेना । ना धरितां न ये ॥ १७॥
वासना कामना आणी कल्पना । हेतु भावना मति नाना ।
ऐशा अनंत वृत्ती जाणा । अंतःकर्णपंचकाच्या ॥ १८॥
असो हें अवघें जाणीव यंत्र । जाणीव म्हणिजे स्मरणमात्र ।
त्या स्मरणास जन्मसूत्र । कैसें लागे ॥ १९॥
देहो निर्माण पांचा भूतांचा । वायो चाळक तयाचा ।
जाणणें हा मनाचा । मनोभाव ॥ २०॥
ऐसें हें सहजचि घडलें । तत्वांचें गुंथाडें जालें ।
कोणास कोणे जन्मविलें । कोण्या प्रकारें ॥ २१॥
तरी हें पाहातां दिसेना । म्हणोन जन्मचि असेना ।
उपजला प्राणी येना । मागुता जन्मा ॥ २२॥
कोणासीच जन्म नाहीं । तरी संतसंगें केलें काई ।
ऐसा अभिप्राव सर्वहि । श्रोतयांचा ॥ २३॥
पुर्वीं स्मरण ना विस्मरण । मधेंचि हें जालें स्मरण ।
अंतर्यामीं अंतःकर्ण । जाणती कळा ॥ २४॥
सावध आहे तों स्मरण । विकळ होतां विस्मरण ।
विस्मरण पडतां मरण । पावती प्राणी ॥ २५॥
स्मरण विस्मरण राहिलें । मग देहास मरण आलें ।
पुधें जन्मास घातलें । कोणास कोणें ॥ २६॥
म्हणोनी जन्मचि असेना । आणी यातना हि दिसेना ।
अवघी वेर्थचि कल्पना । बळावली ॥ २७॥
म्हणौन जन्मचि नाहीं कोणासी । श्रोतयांची आशंका ऐसी ।
मरोन गेलें तें जन्मासी । मागुतें न ये ॥ २८॥

वाळलें काष्ठ हिरवळेना । पडिलें फळ तें पुन्हां लागेना ।
तैसें पडिलें शरीर येना । जन्मास मागुतें ॥ २९ ॥
मडकें अवचितें फुटलें । फुटलें तें फुटोनिच गेलें ।
तैसेंचि पुन्हां जन्मलें । नाहीं मनुष्य ॥ ३० ॥
येथें अज्ञान आणी सज्ञान । सारिखेच जालें समान ।
ऐसा बळावला अनुमान । श्रोतयांसी ॥ ३१ ॥
वक्ता म्हणे हो ऐका । अवघें पाषांड करूं नका ।
अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ॥ ३२ ॥
प्रेत्नेंवीण कार्य जालें । जेविल्यावीण पोट भरलें ।
ज्ञानेंवीण मुक्त जालें । हें तों घडेना ॥ ३३ ॥
स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला ।
परंतु हें समस्तांला । घडले पाहिजे ॥ ३४ ॥
पोहणें सिकला तो तरेल । पोहणें नेणें तो बुडेल ।
येथें हि अनुमान करील । ऐसा कवणु ॥ ३५ ॥
तैसें जयास ज्ञान जालें । ते ते तितुकेच तरले ।
ज्याचें बंधनचि तुटलें । तोचि मुक्त ॥ ३६ ॥
मोकळा म्हणे नाहीं बंधन । आणी प्रत्यक्ष बंदीं पडिले जन ।
त्यांचें कैसें समाधान । तें तुम्ही पाहा ॥ ३७ ॥
नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखसीतळ ।
तैसाच हाहि केवळ । अनुभव जाणावा ॥ ३८ ॥
जयास आत्मज्ञान जालें । तत्वें तत्व विवंचिलें ।
खुणेसी पावतांच बाणलें । समाधान ॥ ३९ ॥
ज्ञानें चुके जन्ममरण । सगट बोलणें अप्रमाण ।
वेदशास्त्र आणी पुराण । मग कासयासी ॥ ४० ॥
वेदशास्त्रविचारबोली । माहानुभावांची मंडळी ।
भूमंडळीं लोक सकळी । हें मानीतना ॥ ४१ ॥
अवघें होतां अप्रमाण । मग आपलेंच काय प्रमाण ।
म्हणोन जेथें आत्मज्ञान । तोचि मुक्त ॥ ४२ ॥
अवघे च मुक्त पाहातां नर । हाहि ज्ञाचा उद्गार ।
ज्ञानेंविण तो उद्धार । होणार नाहीं ॥ ४३ ॥
आत्मज्ञान कळों आले । म्हणोन दृश्य मिथ्या जालें ।
परंतु वेढा लाविलें । सकळास येणें ॥ ४४ ॥
आतां प्रश्न हा फिटला । ज्ञानी ज्ञानें मुक्त जाला ।
अज्ञान तो बांधला । आपले कल्पनेनें ॥ ४५ ॥
विज्ञानासारिखें अज्ञान । आणी मुक्तासारिखें बंधन ।
निश्चयासारिखा अनुमान । मानूंचि नये ॥ ४६ ॥
बंधन म्हणिजे कांहींच नाहीं । परी वेढा लाविलें सर्व हि ।
यास उपावचि नाहीं । कळल्यावांचुनी ॥ ४७ ॥
कांहींच नाहीं आणी बाधी । हेंचि नवल पाहा आधीं ।
मिथ्या जाणिजेना बद्धि । म्हणोन बद्ध ॥ ४८ ॥
भोळा भाव सिद्धी जाव । हा उधाराचा उपाव ।
रोकडा मोक्षाचा अभिप्राव । विवेकें जाणावा ॥ ४९ ॥
प्राणी व्हावया मोकळा । आधीं पाहिजे जाणीवकळा ।
सकळ जाणतां निराळा । सहजचि होये ॥ ५० ॥
कांहींच नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान ।
जाणिव राहातां विज्ञान । स्वयेंचि आत्मा ॥ ५१ ॥
अमृत सेऊन अमर जाला । तो म्हणे मृत्यु कैसा येतो जनाला ।
तैसा विवेकी म्हणे बद्धाला । जन्म तो कैसा ॥ ५२ ॥
जाणता म्हणे जनातें । तुम्हांस भूत कैसे झडपितें ।
तुम्हास वीष कैसें चढतें । निर्विष म्हणे ॥ ५३ ॥
आधीं बद्धासारिकें व्हावें । मग हें नलगेचि पुसावें ।
विवेक दूरी ठेऊन पाहावें । लक्षण बद्धाचें ॥ ५४ ॥
निजेल्यास चेईला तो । म्हणे हा कां रे वोसणातो ।
अनुभव पाहाणेंचि आहे तो । तरी मग निजोन पाहावा ॥ ५५ ॥
ज्ञात्याची उगवली वृत्ती । बद्धाऐसी न पडेल गुंती ।
भुकेल्याची अनुभवप्राप्ती । धाल्यास नाहीं ॥ ५६ ॥
इतुकेन आशंका तुटली । ज्ञानें मोक्षप्राप्ती जाली ।
विवेक पाहातां बाणली । अंतरस्थिती ॥ ५७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विकल्पनिरसननाम समास सातवा ॥ ७ ॥

समास आठवा : देहांतनिरूपण

॥ श्रीराम ॥

ज्ञाता सुटला ज्ञानमतें । परंतु जन्म कैसा बद्धातें ।
बद्धाचें काये जन्मतें । अंतकाळीं ॥ १ ॥
बद्ध प्राणी मरोन गेले । तेथें कांहींच नाहीं उरलें ।
जाणिवेचे विस्मरण जालें । मरणापूर्वी ॥ २ ॥
ऐसी घेतली आशंका । याचें उत्तर ऐका ।
आतां दुश्चीत होऊं नका । म्हणे वक्ता ॥ ३ ॥
पंचप्राण स्थळें सोडिती । प्राणरूप वासनावृत्ती ।
वासनामिश्रीत प्राण जाती । देह सोडुनिया ॥ ४ ॥
वायोसरिसी वासना गेली । ते वायोरूपेंचि राहिली ।
पुन्हां जन्म घेऊन आली । हेतुपरत्वें ॥ ५ ॥
कित्येक प्राणी निःशेष मरती । पुन्हां मागुते जीव येती ।
ढकलून दिल्हें तेणें दुखवती । हस्तपादादिक ॥ ६ ॥
सर्पदृष्टी जालियां वरी । तीं दिवसां उठवी धन्वंतरी ।
तेव्हां ते माघारी । वासना येते कीं ॥ ७ ॥
कित्येक सेवें होऊन पडती । कित्येक तयांस उठविती ।
येमलोकींहून आणिती । माघारे प्राणी ॥ ८ ॥
कित्येक पुर्वीं श्रापिले । ते शापें देह पावले ।
उश्रापकाळीं पुन्हां आले । पूर्वदेहीं ॥ ९ ॥
कित्येकीं बहु जन्म घेतले । कित्येक परकाया प्रवेशले ।
ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ॥ १० ॥
फुंकल्यासरिसा वायो गेला । तेथें वायोसूत निर्माण जाला ।
म्हणोन वायोरूप वासनेला । जन्म आहे ॥ ११ ॥
मनाच्या वृत्ती नाना । त्यांत जन्म घेते वासना ।
वासना पाहातां दिसेना । परंतु आहे ॥ १२ ॥
वासना जाणिजे जाणीवहेत । जाणीव मुळींचा मूळतंत

मूळमायेंत असे मिश्रित । कारणरूपें ॥ १३ ॥
कारणरूप आहे ब्रह्मांडीं । कार्यरूपें वर्ते पिंडीं ।
अनुमानितां तांतडीं । अनुमानेना ॥ १४ ॥
परंतु आहे सूक्ष्मरूप । जैसें वायोचे स्वरूप ।
सकळ देव वायोरूप । आणी भूतसृष्टि ॥ १५ ॥
वायोमधें विकार नाना । वायो पाहातां तरी दिसेना ।
तैसी जाणीववासना । अति सूक्ष्म ॥ १६ ॥
त्रिगुण आणी पंचभूतें । हे वायोमध्यें मिश्रिते ।
अनुमानेना म्हणोन त्यातें । मिथ्या म्हणों नये ॥ १७ ॥
सहज वायो चाले । तरी सुगंध दुर्गंध कळों आले ।
उष्ण सीतळ तप्त निवाले । प्रत्यक्ष प्राणी ॥ १८ ॥
वायोचेनि मेघ वोळती । वायोचेनि नक्षत्रें चालती ।
सकळ सृष्टीची वर्तती गती । सकळ तो वायो ॥ १९ ॥
वायोरूपें देवतें भूतें । आंगीं भरती अकस्मातें ।
वीध केलियां प्रेतें । सावध होतीं ॥ २० ॥
वारें निराळें न बोले । देहामधें भरोन डोले ।
आळी घेऊन जन्मा आले । कित्येक प्राणी ॥ २१ ॥
राहाणें ब्राह्मणसमंध जाती । राहाणें ठेवणीं सांपडती ।
नाना गुंतले उगवती । प्रत्यक्ष राहाणें ॥ २२ ॥
ऐसा वायोचा विकार । येवंचे कळेना विस्तार ।
सकळ कांहीं चराचर । वायोमुळें ॥ २३ ॥
वायो स्तब्धरूपें सृष्टीधर्ता । वायो चंचळरूपें सृष्टीकर्ता ।
न कळे तरी विचारीं प्रवर्ता । म्हणिजे कळे ॥ २४ ॥
मुळापासून सेवटवरी । वायोचि सकळ कांहीं करी ।
वायोवेगळें कर्तुत्व चतुरीं । मज निरोपावें ॥ २५ ॥
जाणीवरूप मूळमाया । जाणीव जाते आपल्या ठाया ।
गुप्त प्रगट होऊनियां । विश्वीं वर्ते ॥ २६ ॥
कोठें गुप्त कोठें प्रगटे । जैसें जीवन उफाळे आटे ।
पुढें मागुता वोघ लोटे । भूमंडळीं ॥ २७ ॥
तैसाच वायोमधें जाणीवप्रकार । उमटे आटे निरंतर ।
कोठें विकारें कोठें समीर । उगाच वाजे ॥ २८ ॥
वारीं आंगावरून जाती । तेणें हातपाये वाळती ।
वारां वाजतां करपती । आलीं पिकें ॥ २९ ॥
नाना रोगांचीं नाना वारीं । पीडा करिती पृथ्वीवरी ।
वीज कडाडी अंबरीं । वायोमुळें ॥ ३० ॥
वायोकरितां रागोद्धार । कळे वोळखीचा निर्धार ।
दीप लागे मेघ पडे हा चमत्कार । रागोद्धारीं ॥ ३१ ॥
वायो फुंकितां भुली पडती । वायो फुंकितां खांडकें करपती ।
वायोकरितां चालती । नाना मंत्र ॥ ३२ ॥
मंत्रें देव प्रगटती । मंत्रें भूतें अखरकिती ।
बाजीगरी वोडंबरी करिती । मंत्रसामर्थ्यें ॥ ३३ ॥
राक्षसांची मावरचना । ते हे देवांदिकां कळेना ।
विचित्र सामर्थ्यें नाना । स्तंबनमोहनादिकें ॥ ३४ ॥
धडचि पिसें करावें । पिसेंच उमजवावें ।
नाना विकार सांगावे । किती म्हणोनी ॥ ३५ ॥
मंत्रीं संग्राम देवाचा । मंत्रीं साभिमान ऋषीचा ।
महिमा मंत्रसामर्थ्याचा । कोण जाणे ॥ ३६ ॥
मंत्रीं पक्षी आटोपिती । मूशकें स्वापदें बांधती ।
मंत्रीं माहसर्प खिळिती । आणी धनलाभ ॥ ३७ ॥
आतां असो हा प्रश्न जाला । बद्धाचा जन्म प्रत्यया आला ।
मागील प्रश्न फिटला । श्रोतयाचा ॥ ३८ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देहांतनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥ ९.८

समास नववा : संदेहवारण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म वारितां वारेना । ब्रह्म सारितां सरेना ।
ब्रह्म कांहीं वोसरेना । येकीकडे ॥ १ ॥
ब्रह्म भेदितां भेदेना । ब्रह्म छेदितां छेदेना ।
ब्रह्म परतें होयेना । केलें तरी ॥ २ ॥
ब्रह्म खंडेना अखंड । ब्रह्मीं नाहीं दुसरें बंड ।
तरी कैसें हें ब्रह्मांड । सिरकलें मधें ॥ ३ ॥
पर्वत पाषाण सिळा सिखरें । नाना स्थळें स्थळांतरें ।
भूगोळरचना कोण्या प्रकारें । जालीं परब्रह्मीं ॥ ४ ॥
भूगोळ आहे ब्रह्मामधें । ब्रह्म आहे भूगोळामधें ।
पाहातां येक येकामधें । प्रत्यक्ष दिसे ॥ ५ ॥
ब्रह्मीं भूगोळें पैस केला । आणी भूगोळहि ब्रह्में भेदिला ।
विचार पाहातां प्रत्यय आला । प्रत्यक्ष आतां ॥ ६ ॥
ब्रह्में ब्रह्मांड भेदिलें । हें तों पाहातां नीटचि जालें ।
परी ब्रह्मास ब्रह्मांडें भेदिलें । हें विपरीत दिसे ॥ ७ ॥
भेदिलें नाहीं म्हणावें । तरी ब्रह्मीं ब्रह्मांड स्वभावें ।
हें सकळांस अनुभवें । दिसत आहे ॥ ८ ॥
तरी हें आतां कैसें जालें । विचारून पाहिजे बोलिलें ।
ऐसें श्रोतीं आक्षेपिलें । आक्षेपवचन ॥ ९ ॥
आतां याचें प्रत्योत्तर । सावध ऐका निरोत्तर ।
येथें पडिले किं विचार । संदेहाचे ॥ १० ॥
ब्रह्मांड नाहीं म्हणो तरी दिसे । आणी दिसे म्हणो तरी नासे ।
आतां हें समजती कैसें । श्रोतेजन ॥ ११ ॥
तंव श्रोते जाले उद्दित । आहों म्हणती सावचित्त ।
प्रसंगें बोलों उचित । प्रत्योत्तर ॥ १२ ॥
आकाशीं दीपास लाविलें । दीपें आकाश परतें केलें ।
हें तों घडेना पाहिलें । पाहिजे श्रोतीं ॥ १३ ॥
आप तेज अथवा पवन । सारूं न सकती गगन ।
गगन पाहातां सघन । चळेल कैसें ॥ १४ ॥
अथवा कठीण जाली मेदिनी । तरी गगनें केली चाळणी ।
पृथ्वीचें सर्वांग भेदूनी । राहिलें गगन ॥ १५ ॥
याची प्रचित ऐसी असे । जें जडत्वा आलें तितुकें नासे ।

आकाश जैसें तैसें असे । चळणार नाहीं ॥ १६ ॥
वेगळेपण पाहावें । तयास आकाश म्हणावें ।
अभिन्न होतां स्वभावें । आकाश ब्रह्म ॥ १७ ॥
तस्मात आकाश चळेना । भेद गगनाचा कळेना ।
भासलें ब्रह्म तयास जाणा । आकाश म्हणावें ॥ १८ ॥
निर्गुण ब्रह्मसें भासलें । कल्पूं जातां अनुमानलें ।
म्हणोन आकाश बोलिलें । कल्पनेसाठीं ॥ १९ ॥
कल्पनेसि भासे भास । तितुकें जाणावें आकाश ।
परब्रह्म निराभास । निर्विकल्प ॥ २० ॥
पंचभूतांमधें वास । म्हणौन बोलिजे आकाश ।
भूतांतरीं जो ब्रह्मांश । तेंचि गगन ॥ २१ ॥
प्रत्यक्ष होतें जातें । अचळ कैसें म्हणावें त्यातें ।
म्हणोनियां गगनातें । भेदिलें नाहीं ॥ २२ ॥
पृथ्वी विरोन उरे जीवन । जीवन नस्तां उरे अग्न ।
अग्न विझतां उरे पवन । तोहि नसे ॥ २३ ॥
मिथ्या आलें आणी गेलें । तेणें खरें तें भंगलें ।
ऐसें हें प्रचितीस आलें । कोणेंपरी ॥ २४ ॥
भ्रमें प्रत्यक्ष दिसतें । विचार पाहातां काये तेथें ।
भ्रममूळ या जगातें । खरें कैसें म्हणावें ॥ २५ ॥
भ्रम शोधितां कांहींच नाहीं । तेथें भेदिलें कोणें काई ।
भ्रमें भेदिलें म्हणतां ठाई । भ्रमचि मिथ्या ॥ २६ ॥
भ्रमाचें रूप मिथ्या जालें । मग सुखें म्हणावें भेदिलें ।
मूळीं लटिकें त्यानें केलें । तेंहि तैसें ॥ २७ ॥
लटिक्यानें उदंड केलें । तरी आमुचें काय गेलें ।
केलें म्हणतांच नाथिलें । शाहाणे जाणती ॥ २८ ॥
सागरामधें खसखस । तैसें परब्रह्मीं दृश्य ।
मतिसारिखा मतिप्रकाश । अंतरीं वाढे ॥ २९ ॥
मती करितां विशाळ । कवळो लागे अंतराळ ।
पाहातां भासे ब्रह्मगोळ । कवीठ जैसें ॥ ३० ॥
वृत्ति त्याहून विशाळ । करितां ब्रह्मांड बद्रिफळ ।
ब्रह्माकार होतां केवळ । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥
आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा जाला ।
मग ब्रह्मगोळ देखिला । वटबीजन्यायें ॥ ३२ ॥
होतां त्याहून विस्तीर्ण । वटबीज कोटिप्रमाण ।
आपाण होतां परिपूर्ण । कांहींच नाहीं ॥ ३३ ॥
आपण भ्रमें लाहानाळला । केवळ देहधारी जाला ।
तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें ॥ ३४ ॥
वृत्ती ऐसी वाढवावी । पसरून नाहींच करावी ।
पूर्णब्रह्मास पुरववी । चहूंकडे ॥ ३५ ॥
जंव येक सुवर्ण आणितां । तेणें ब्रह्मांड मढवितां ।
कैसे होईल तें तत्वतां । बरें पाहा ॥ ३६ ॥
वस्तु वृत्तिस कवळे । तेणें वृत्ति फाटोन वितुळे ।
निर्गुण आत्माच निवळे । जैसा तैसा ॥ ३७ ॥
येथें फिटली आशंका । श्रोते हो संदेह धरूं नका ।
अनुमान असेल तरी विवेका । अवलोकावें ॥ ३८ ॥
विवेकें तुटें अनुमान । विवेकें होये समाधान ।
विवेकें आत्मनिवेदन । मोक्ष लाभे ॥ ३९ ॥
केली मोक्षाची उपेक्षा । विवेकें सारिलें पूर्वपक्षा ।
सिद्धांत आत्मा प्रत्यक्षा । प्रमाण न लगे ॥ ४० ॥
हे प्रचितीचीं उत्तरें । कळती सारासारविचारें ।
मननध्यासें साक्षात्कारें । पावन होईजे ॥ ४१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
संदेहवारणनाम समास नववा ॥ ९ ॥ ९.९

समास दहावा : स्थितिनिरूपण

॥ श्रीराम ॥

देउळामधें जगन्नायेक । आणी देवळावरी बैसला काक ।
परी तो देवाहुन अधिक । म्हणों नये कीं ॥ १ ॥
सभा बैसली राजद्वारीं । आणी मर्कट गेलें स्तंभावरी ।
परी तें सभेहून श्रेष्ठ चतुरीं । कैसे मानावें ॥ २ ॥
ब्राह्मण स्नान करून गेले । आणी बक तैसेचि बैसले ।
परी ते ब्राह्मणापरीस भले । कैसे मानावे ॥ ३ ॥
ब्राह्मणामधें कोणी नेमस्त । कोणी जाले अव्यावेस्त ।
आणी स्वान सदा ध्यानस्त । परी तें उत्तम नव्हे ॥ ४ ॥
ब्राह्मण लक्षमुद्रा नेणें । मार्जर लक्षविषईं शाहाणें ।
परी ब्राह्मणापरीस विशेष कोणें । म्हणावें तयासी ॥ ५ ॥
ब्राह्मण पाहे भेदाभेद । मक्षिका सर्वांस अभेद ।
परी तीस जाला ज्ञानबोध । हें तों न घडे कीं ॥ ६ ॥
उंच वस्त्रें नीच ल्याला । आणी समर्थ उघडाच बैसला ।
परी तो आहे परिक्षिला । परीक्षवंतीं ॥ ७ ॥
बाह्याकार केला अधिक । परी तो अवघा लोकिक ।
येथें पाहिजे मुख्य येक । अंतरनिष्ठा ॥ ८ ॥
लोकिक बरा संपादिला । परी अंतरीं सावध नाहीं जाला ।
मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ॥ ९ ॥
देवास भजतां देवलोक । पित्रांस भजतां पित्रलोक ।
भूतांस भजतां भूतलोक । पाविजेतो ॥ १० ॥
जेणें जयास भजावें । तेणें त्या लोकासी जावें ।
निर्गुणीं भजतां व्हावें । निर्गुणचि स्वयें ॥ ११ ॥
निर्गुणाचें कैसें भजन । निर्गुणीं असावें अनन्य ।
अनन्य होतां होईजे धन्य । निश्चयेंसीं ॥ १२ ॥
सकळ केलियाचें सार्थक । देव वोळखावा येक ।
आपण कोण हा विवेक । पाहिला पाहिजे ॥ १३ ॥
देव पाहातां निराकार । आपला तो माईक विचार ।
सोहं आत्मा हा निर्धार । बाणोन गेला ॥ १४ ॥
आतां अनुमान तो काई । वस्तु आहे वस्तुचा ठाई ।
देहभाव कांहींच नाहीं । धांडोळितां ॥ १५ ॥
सिद्धास आणी साधन । हा तों अवघाच अनुमान ।

मुक्तास आणी बंधन । आडळेना ॥ १६ ॥
साधनें जें कांहीं साधावें । तें तों आपणचि स्वभावें ।
आतां साधकाच्या नावें । सुन्याकार ॥ १७ ॥
कुल्लाळ पावला राजपदवी । आतां रासभें कासया राखावी ।
कुल्लाळपणाची उठाठेवी । कासया पाहिजे ॥ १८ ॥
तैसा अवघा वृत्तीभाव । नाना साधनांचा उपाव ।
साध्य जालियां कैंचा ठाव । साधनांसी ॥ १९ ॥
साधनें काये साधावें । नेमें काये फळ घ्यावें ।
आपण वस्तु भरंगळावें । कासयासी ॥ २० ॥
देह तरी पांचा भूतांचा । जीव तरी अंश ब्रह्मींचा ।
परमात्मा तरी अनन्याचा । ठाव पाहा ॥ २१ ॥
उगेंचि पाहातां मीपण दिसे । शोध घेतां कांहींच नसे ।
तत्वें तत्व निरसे । पुढें निखळ आत्मा ॥ २२ ॥
आत्मा आहे आत्मपणें । जीव आहे जीवपणें ।
माया आहे मायापणें । विस्तारली ॥ २३ ॥
ऐसें अवघेंचि आहे । आणी आपण हि कोणीयेक आहे ।
हें सकळ शोधून पाहे । तोचि ज्ञानी ॥ २४ ॥
शोधूं जाणें सकळांसी । परी पाहों नेणे आपणासी ।
ऐक ज्ञानी येकदेसी । वृत्तिरूपें ॥ २५ ॥
तें वृत्तिरूप जरी पाहिलें । तरी मग कांहींच नाहीं राहिलें ।
प्रकृतिनिरासें अवघेंचि गेलें । विकारवंत ॥ २६ ॥
उरलें तें निखळ निर्गुण । विवंचितां तेंचि आपण ।
ऐसी हे परमार्थाची खूण । अगाध आहे ॥ २७ ॥
फळ येक आपण येक । ऐसा नाहीं हा विवेक ।
फळाचें फळ कोणीयेक । स्वयेंचि होईजे ॥ २८ ॥
रंक होता राजा जाला । वरें पाहातां प्रत्यय आला ।
रंकपणाचा गल्बला । रंकीं करावा ॥ २९ ॥
वेद शास्त्रें पुराणें । नाना साधनें निरूपणें ।
सिद्ध साधु ज्याकारणें । नाना सायास करिती ॥ ३० ॥
तें ब्रह्मरूप आपणचि आंगें । सारासारविचारप्रसंगें ।
करणें न करणें वाउगें । कांहींच नाहीं ॥ ३१ ॥
रंक राजआज्ञासि भ्यालें । तेंचि पुढें राजा जालें ।
मग तें भयेचि उडालें । रंकपणासरिसें ॥ ३२ ॥
वेदें वेदाज्ञेनें चालावें । सच्छास्त्रें शास्त्र अभ्यासावें ।
तीर्थें तीर्थास जावें । कोण्या प्रकारें ॥ ३३ ॥
अमृतें सेवावें अमृत । अनंतें पाहावा अनंत ।
भगवंतें लक्षावा भगवंत । कोणा प्रकारें ॥ ३४ ॥
संत असंत त्यागावे । निर्गुणें निर्गुणासी भंगावें ।
स्वरूपें स्वरूपीं रंगावें । कोण्या प्रकारें ॥ ३५ ॥
अंजनें ल्यावें अंजन । धनें साधावें धन ।
निरंजनें निरंजन । कैसें अनुभवावें ॥ ३६ ॥
साध्य करावें साधनासी । ध्येयें धरावें ध्यानासी ।
उन्मनें आवरावें मनासी । कोण्या प्रकारें ॥ ३७ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
स्थितिनिरूपणनाम समास दहावा ॥ १० ॥ ९.१०
॥ दशक नववा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni